स्वच्छता अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद



रामटेक : माजी नगराध्यक्ष स्व. मुलचंद मानकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १ मार्चपासून विविध वॉर्डांत नगरपरिषदेतर्फे शहरात राबविण्यात आलेल्या ग्रामस्वच्छता अभियानास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भाजपा नगराध्यक्ष दिलीप देशमुख व उपाध्यक्ष कविता मुलमुले यांनी न.पा.च्या पहिल्याच सभेत शहरविकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. रेंगाळलेल्या विकासकामांवर भर देणार असल्याचे सांगितले. कर्तव्यात हयगय व कामचुकारपणा करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा देशमुखांनी या वेळी दिला. सत्तारूढ नगराध्यक्ष व नगरसेवकांनी स्वच्छता अभियान राबवून रामटेक विकासाचे पाऊल हातात झाडू घेऊन केल्याने उपक्रमाची परिसरात चर्चा होत आहे. यामध्ये अर्चना मेंढे, दिलीप देशमुख, कविता मुलमुले, संजय बिसमोगरे, चित्रा धुरई, आलोक मानकर, पद्माकर खेडकर, पद्मा ठेंगरे आदींनी रामाळेश्वर वॉर्डात न.प. कर्मचारी व सफाई कामगारांच्या मदतीने स्वच्छता अभियान सप्ताह राबविला.

काचुरवाही येथे शिव प्रभातफेरी



काचुरवाही : स्थानिक प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय गीता पाठशाला काचुरवाहीच्या वतीने नुकतीच काचुरवाही येथे शिव प्रभातफेरी काढण्यात आली होती. तद्नंतर स्थानिक रहिवासी विश्वनाथ नाटकर यांच्या निवासस्थानी प्रभातफेरीचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वि. के. छायादीदी होत्या. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून परमात्मा शिव ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी ललितादीदी, विश्वनाथ नाटकर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रोशन मोहनकार, निषेद्र भाई, सुरेंद्र सोकोरे, मंजुळा सोमनाथे, देवकी सोमनाथे, कांता उईके आदींनी सहकार्य केले.

रामटेकात आज वार्षिक अधिवेशन

रामटेक : विद्यासागर शिक्षणसंस्थेद्वारा संचालित विद्यासगर कला महाविद्यालय खैरी बिजेवाडातर्फे ४ व ५ मार्च रोजी स्थानिक टक्कामोरे सेलिबैशन हॉल येथे विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४१ व्या वार्षिक अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार आशिष जयस्वाल तर कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेकच्या कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांची विशेष उपस्थिती राहील. उद्घाटन रातुम नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सिद्धार्थविनायक काणे करतील. शनिवारी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार व भारतातील कृषिक्षेत्रातील अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप' या विषयावर चर्चासत्र होणार असून डॉ. कुमार शास्त्री यांचे यावर व्याख्यान होणार आहे. रविवारी 'आर्थिक ग्रंथातील विचारविश्व' या विषयावर डॉ. विनायक देशपांडे विचार व्यक्त करतील. 'विदर्भातील नैसर्गिक साधनसंपत्ती' या विषयावरील चर्चासत्रानंतर डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचा समारोप करण्यात येईल. कार्यक्रमाला खासदार कृपाल तुमाने व आमदार मल्लिकार्जुन रेड्डी उपस्थित राहतील.

भूगाव येथे मानवधर्माचे सेवक संमेलन



भूगाव : स्थानिक परिसरात २८ फेब्रुवारी रोजी मानवधर्माचे सेवक संमेलन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन देवराव मदनकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून माजी जि.प. अध्यक्ष सुरेश भोयर उपस्थित होते. चंद्रभान सावरकर यांनी हवन केले. ढोलताशांच्या गजरात जुमदेवबाबांची रॅली काढण्यात आली. ठिकठिकाणी अल्पोपाहाराची व्यवस्था करण्यात आली. चार तत्त्व, तीन शब्द, पाच नियम व अनुभवावर बैठक घेण्यात आली. या प्रसंगी हटवार यांनी मतभेद न करता एकतेचे आवाहन केले, तर अवंतिका लेकुरवाळे यांनी दारूबंदी व अंधश्रद्धामुक्ती करण्यात सरकार अपयशी ठरल्याचे सांगितले. सेवकांवर अत्याचार होत असल्याने सेवक मंडळांनी एकत्र यावे, असा हितोपदेश दिला. संमेलनाला भारत आंबीलडुके, रामचंद्र झाडे, धर्मराज बावनकुळे, गंगाधर हटवार, देवराम मदनकर, ठाकरे, राजू गुरनुले, दौलत जांभूळकर, रमेश चिकटे, अनिल निधान, राजकुमार घुले, संगीता तांबे उपस्थित होते. प्रास्ताविक संजय गायधने यांनी केले.

चंद्रपाल चौकसे यांना समाजमित्र पुरस्कार



रामटेक : समाजबांधवांना एकत्रित करणाऱ्या जैन कलार सेवा समिती 'प्रयास'च्या नुकत्याच पार पडलेल्या कौटुंबिक स्नेहमिलन, आनंद मेळावा व सत्कार समारंभात पर्यटकमित्र चंद्रपाल चौकसे यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते 'समाजमित्र' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर आमदार नागो गाणार, माजी मंत्री अनिल देशमुख, माजी आमदार मोहन मते, जयप्रकाश गुप्ता, प्रयासचे संस्थापक अध्यक्ष अनिल अहीरकर, अध्यक्ष शेखर आदमने, संयोजक रविकांत हरडे, शशिकांत समर्थ, बंडू राऊत, कृष्णा खानोरकर, अतुल दुरुगकर, प्रदीप खानोरकर होते. चौकसेंनी केलेले सर्वधर्मीय सामूहिक विवाह, विविध पर्यटन केंद्रांवर केलेली वृक्षलागवड, बेरोजगारांना रोजगार, पुरामध्ये अडकलेल्यांना वाचविण्यासाठी प्रशासनाला बोटी दिल्या, ऑपरेटर, रामधाम तीर्थक्षेत्राची निर्मिती याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी जयप्रकाश गुप्ता, संजय चिमूरकर, कार्तिक शेंडे, नगरसेविका रूपा राय, स्नेहल बिहारे, संजय महाजन, सतीश वारजूरकर उपस्थित होते.

नवीन गुमगाव येथे भीषण पाणीटंचाई

- लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज
- नागरिकांची पाण्यासाठी भटकंती
- ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा


पुण्य नगरी तालुका प्रतिनिधी

हिंगणा : तालुक्यातील नवीन गुमगाव (वागदरा) हे पुनर्वसित गाव असून येथे दोन पाण्याच्या टाक्या आहेत. परंतु विहिरींच्या पाण्याची पातळी खोल गेल्याने येथे भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही येथील विहिरींची पाण्याची पातळी खोल गेली. गावालगतच वेणा नदी वाहते. परंतु दोन महिन्यांपूर्वीच ती कोरडी पडली आहे. विहिरी व बोअरवेल्समधील पाण्याचा स्रोत कमालीचा खाली गेला आहे. पुढे कडक उन्हाळा सुरू होणार असल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या आणखी बिकट होणार आहे. या संभाव्य पाणीटंचाईकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

वागदरा गावालगत असलेल्या वेणा नदीवर लाखो रुपये खर्च करून कोल्हापुरी बंधारा बांधण्यात आला.





परंतु बंधाऱ्यात पाण्याचा साठा करण्यात आला नाही. ज्या उद्देशाने बंधारा निर्माण करण्यात आला तो पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे पाण्याची समस्या आणखी जटिल होणार असल्याची चिन्हे दिसून येत आहेत. गाव एक किलोमीटर दूर अंतरावर असल्याने ग्रामपंचायतीला गावाला पाणीपुरवठा करताना तारेवरची कसरत करावी लागते. पाणीपुरवठा करूनही नागरिकांना चार ते पाच गुंड पाणी मिळेनासे झाले आहे. त्यामुळे कपडेलत्ते, भांडीकुंडी व आंघोळीसाठी लागणारे पाणी मिळणे दुरापास्त झाले आहे. तेव्हा स्थानिक लोकप्रतिनिधींनी या समस्येची वेळीच दखल घ्यावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

न.प. अस्थायी कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ

- मजुरांना खाते क्रमांक दिलाच नाही
- दोन मुख्याधिकाऱ्यांचा प्रश्न कायम

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

कामठी : स्थानिक नगरपरिषदेने २५ ते ३० वर्षांपूर्वी अस्थायी कर्मचाऱ्यांची विविध विभागांत नियुक्ती केली होती. परंतु कामगारांना जानेवारीपासून वेतन मिळाले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

कामठी नगरपरिषद म्हणजे महाराष्ट्राची उपराजधानी मानल्या जाणाऱ्या नागपूर जिल्ह्याचे मोठे तहसील क्षेत्र आहे. येथील लोकसंख्येतही वाढ झाली आहे. कामठी तहसील क्षेत्राच्या नागरीसुविधा पूर्ण करण्याकरिता येथे नगरपरिषदेची स्थापना करण्यात आली. येथे स्थायी अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. परंतु काळानुरूप कामठी शहराचे सीमा क्षेत्रफळ व लोकसंख्येत वाढ झाली. परिणामी, कामठी नगरपरिषदेचे कार्य वाढत गेले. अशा परिस्थितीत नगरपरिषदेत त्या वेळी जे कार्मचारी स्थायी होते त्यांना आपापला कार्यभार सांभाळावा लागत होता. मात्र अतिरिक्त कार्य करावे लागत असल्याने नगरपरिषदेने विविध विभागांत अस्थायी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती. परंतु आज त्यांच्यावरच उपासमारीची वेळ आल्याचे दिसून येते. नगरपरिषदेचे अधिकारी स्वतःचे वेतन काढून घेत आहेत. मात्र अस्थायी कर्मचारी पगारापासून वंचित आहेत. कामठी नगरपरिषदेत रवींद्र भिलावे व सुधीर शंभरकर असे दोन मुख्याधिकारी कार्यरत आहेत. मात्र दोघांपैकी मुख्य कोण, असा प्रश्न कर्मचारी व जनतेसमोर निर्माण झाला आहे. रोजंदारी मजुरांच्या वेतनामधून पीएफची जी रक्कम कापली जाते त्याचा खाते क्रमांक अजूनही मजुरांना देण्यात आला नाही हे विशेष.

कामठी न.प. सदस्यपदी सुभाष मंगतानी

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी



कामठी : स्थानिक न.प.च्या सदस्यपदी नुकतीच सुभाष मंगतानी यांची निवड करण्यात आली. सदस्यपदाच्या निवडणुकीत सत्ताधारी गटातील दोन, विरोधी गटाला एक सदस्य मिळाला. यानुसार पीठासीन अधिकारी व नगराध्यक्ष शहाजहा शफात यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवडणुकीत सविता शर्मा व रमेश दुबे यांची सदस्यपदी निवड झाली. मात्र विरोधी गटाने सदस्यांची नावे न सुचविल्याने हे पद रिक्त होते. यासाठी निवडणूक घेण्यात आली. यामध्ये सुभाष मंगतानी बिनविरोध निवडून आले. या प्रसंगी न.प. उपाध्यक्ष काशिनाथ प्रधान, नगरसेविका वैशाली मानवटकर, नगरसेवक नीरज लोणारे, संध्या रायबोले, सुषमा शिलाम, रमा गजभिये, प्रतीक पडोळे, छोटू मानवटकर, लालसिंग यादव, अजय कदम, संजय खोब्रागडे, विवेक मंगतानी, राजा देशमुख उपस्थित होते.

नशीब बलवत्तर म्हणून वाचला जीव

- प्रसाधनगृह सुरू करण्याची मागणी

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

नरखेड : प्रसाधनगृह अनेक वर्षांपासून बंद असल्याने लघुशंकेला गेलेल्या प्रवाशावर जीव गमाविण्याची वेळ आली होती. मात्र नशीब बलवत्तर म्हणून प्राण वाचल्याची घटना नरखेड येथे नुकतीच घडली. त्यामुळे रेल्वेस्टेशनच्या फलाट क्र. २ वरील बंद प्रसाधनगृह सुरू करावे, अशी मागणी प्रवाशांनी केली.

मुंदाफळे महाविद्यालयातील अस्थायी प्राध्यापक प्रगती कुकडे या १३ फेब्रुवारी पती सुभाष कुकडे यांच्यासोबत रेल्वेने नागपूर येथे जात होत्या. सुभाष कुकडे यांनी फलाट क्र. ३ वर उभ्या मालगाडीच्या खालून लघुशंकेला जाण्याचा प्रयत्न केला.

यादरम्यान अचानक मालगाडी सुरू झाली. प्रसंगावधान राखून कुकडे गाडीच्या खालून बाहेर पडल्यामुळे अनर्थ टळला. त्यामुळे त्यांनी स्टेशनमास्तर यांना गाठून फलाट क्र. २ वर प्रसाधनगृह सुरू करण्याची मागणी केली. मात्र त्यांनी पाण्याचे कारण पुढे करून प्रसाधनगृह सुरू करता येणार नसल्याचे सांगितले. प्रसाधनगृह सुरू न झाल्यास प्रवासी आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याचे दिसून येते.

लेखन करताना भाषाज्ञान आवश्यक : दिवे

- संस्कृतलेखन आणि मुद्रितशोधन कार्यशाळेचे उद्घाटन

पुण्य नगरी तालुका प्रतिनिधी

रामटेक : कार्यशाळेचा विषय संवादाचा आहे. संवाद म्हणजे स्वतःच स्वतःचे आकलन करणे होय. पण आजच्या गतिमान काळात स्वतःशी संवाद करण्याची प्रक्रिया क्षीण झाली आहे. भाषा विचारांना आकार देते. कोणत्याही भाषेत लेखन करताना त्या भाषेचे व्यवस्थित ज्ञान असणे आवश्यक आहे. भाषेचे सुयोग्य ज्ञान असले तरच अचूक मुद्रितशोधन करता येते. संगणकाच्या वापरामुळे लेखन व मुद्रितशोधन करणे सोपे झाले. एखादा विषय मांडायचा असल्यास त्यात महत्त्वाचे असतात ते विचार आणि भाषा! त्यामुळे आजच्या बदलत्या काळात कार्यशाळेचे आयोजन खऱ्या अर्थाने महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन पत्रकार राजेंद्र दिवे यांनी केले.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेकच्या वेद तथा व्याकरण विभाग व राष्ट्रीय संस्कृत संस्थान नवी दिल्लीच्या सहकार्याने आयोजित संस्कृतलेखन आणि मुद्रितशोधन कार्यशाळेचे उद्घाटन गुरुवारी (२ मार्च) करण्यात आले त्या वेळी ते बोलत होते. २ ते २२ मार्चपर्यंत ही कार्यशाळा चालणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता डॉ. सी. जी. विजयकुमार तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार राजेंद्र



दिवे, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. हरेकृष्ण अगस्ती उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. अगस्ती यांनी केले. या प्रसंगी डॉ. विजयकुमार यांनी दिवे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

कार्यशाळेद्वारे आम्ही एक नवीन संकल्पना सादर करीत आहोत. कोणत्याही भाषेची काही मूलभूत तत्त्वे असतात. संस्कृत भाषेतील वर्ण, पद, वाक्यांचे विविध तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. संस्कृतलेखनाची वैशिष्ट्ये, त्यामध्ये होणारे व्याकरणदोष, ते दूर करण्यासाठीचे नियम व युक्त्या यांचे मार्गदर्शन कार्यशाळेत केले जाणार आहे.

संस्कृतलेखन अधिकाधिक निर्दोष व्हावे हा या कार्यशाळेचा उद्देश आहे, असे डॉ. विजयकुमार या वेळी म्हणाले. संचालन डॉ. शिवराम भट यांनी केले. आभार डॉ. जयवंत चौधरी यांनी मानले.

सुतार समाजाचा स्नेहमिलन सोहळा

पुण्य नगरी / वार्ताहर

वानाडोंगरी : बहुउद्देशीय सुतार समाज सेवा समिती बुटीबोरीतर्फे नुकताच बुटीबोरी येथील स्व. किशोरभाऊ वानखेडे सांस्कृतिक सभागृहात सुतार समाजाचा स्नेहमिलन सोहळा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वकर्मा वंशीय समाज संघटक व राज्य प्रचारक सुनील जानवे होते. उद्घाटन जिनिंग ॲण्ड प्रेसिंगचे माजी अध्यक्ष देवराव डोईफोडे यांनी केले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अ. भा. शिल्पकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गजानन देऊळकर, नगरसेविका आरती वांढरे, पत्रकार प्रा. पीयूष पोकळे, किशोर भांदककर उपस्थित होते. समाजाच्या प्रगतीकरिता प्रत्येक घटकाने संघटित होणे काळाची गरज आहे, असे पोकळे या वेळी म्हणाले. या प्रसंगी वसंत दारव्हणकर व कुणाल लांडे यांच्यातर्फे प्रमिला बोरटकर व रंजना डाखोळे यांना शिलाई मशीन तर पोकळेंकडून तबलावादक कुणाल माणूसमारे यांना रोख पारितोषिक देण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमातील विजेत्यांना समितीकडून स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. प्रास्ताविक वसंत दारव्हणकर यांनी, तर संचालन रमण राखुंडे व शुभम नवघरे यांनी केले. आभार दत्तराज बोरटकर यांनी मानले. कार्यक्रमाला मुन्ना जयस्वाल, बबलू गौतम, विनोद लोहकरे, सरपंच समीर जयस्वाल, प्रदीप राजूरकर, जितेश बुडकर, कायरकर उपस्थित होते.




आडवे शब्द

१. अक्षरे योजून त्याआधारे करावयाचे गणित
५. दक्ष, जागृत, होशियार
७. दुसऱ्यावर केलेले उपकार
११. 'या' सुवासिक फुलांचा गजरा बनवतात
१२. मालीश, मर्दन
१४. राजाची ऐट मिरवणारा मोठा हत्ती
१६. तळ, खालचा भाग
१७. दरोडा, चोरी
१८. सावकार; 'ऋणको'च्या विरुद्ध
२०. सापाने टाकलेली जीर्ण त्वचा
२१. अंड्यातला पिवळा भाग
२३. वर्ष, साल
२४. पुन्हा, फिरुन एकदा; माघारी
२६. भाजी वगैरे चिरण्याचे एक साधन
२७. मराठमोळा प्रणाम
२९. पास, संमतीपत्र, लायसन्स
३०. जल, उदक, नीर
३१. फुरसत, सवड, मोकळीक
३२. भरदुपारची भयंकर उष्णता, रणरण
३३. तांबडी माती, गेरु
३५. कुसुम, पुष्प
३६. मकरंद, पुष्परस
३७. गंध, परिमळ; वास्तव्य
३८. शंकर पाटील यांचा एक कथासंग्रह
३९. संताप, घुस्सा, क्रोध
४१. चित्त, अंतःकरण
४३. महादेवाचे वाहन
४४. एक अधिक अर्धा
४५. धर्मेंद्र-आदित्य पांचोली-एकता-नसिरुद्दीन शहा यांचा चित्रपट
४७. शिजवलेला तांदूळ
४८. बासरी, अलगुज
४९. एका वॉशिंग पावडरचे नाव
५१. कर्मचारी, मजूर
५३. मेंढरांचे कापलेले केस
५४. कालच्या आधीचा वा उद्यानंतरचा दिवस
५६. मोठी दिवटी
५८. विवाहादी कार्यसिद्धीसाठी स्थापलेली देवता
५९. निकड, गरज; अडचण
६१. काजळ, अंजन
६३. मोठे तळे
६५. वस्त्र विणण्याचे हाताने चालवण्याचे यंत्र
६७. डोंगरात लागलेली मोठी आग
६९. इंग्रजीत 'चहा'
७०. तोंडाला फासावयाची सुवासिक भुकटी, चूर्ण
७२. उपयोग
७४. श्रीरामाचे वडील
७८. समुद्राच्या लाटेचा आवाज
७९. प्रसूतिवेदना
८०. भारताच्या लिटील मास्टर क्रिकेटपटूचे फक्त आडनाव
८२. केस रंगविण्याचे रसायन
८४. स्त्रीचे पिशाच, जखीण
८५. लुटारु, शर्विलक
८६. लालसा, कामना, भोगेच्छा

कालच्या शब्दखेळचे उत्तर

सं	त	ती		पू	र	ब	ओ	र	प	श्वि	म		बा	ज
त	मा	स	गी	र		का	र	वा	र		न	म	की	न
त			त		त	ल	त		म	ली	न		बा	क
धा	गा		गा	ज	र			न	वी	न		आ	ब	
र		स	ता	र		अ	ज	ग	र		घा	म		छ
	क	व	च		रा	स्त		र	च	ना		दा	मा	द
क	र	त	ल		ज	र	ठ		क्र	म	वा	र		
पु				ऊ	स		स	जा		दा	ढ		क	स
र	ज	नी	का	त		दु	का	न	दा	र		सु	म	न
	व	र	दा			श्म			ढी		मा	गी	ल	
का	स	व		दा	स	न	व	मी		मो	द		ह	मी
बू			वे	रु	ळ		जा	ल	ना		क	र	स	न
ल	व	कु	श		स	भा		न	ग	र		पे	न	
	त	मा		चा	ळ	क	री		पू	जा	भ	ट		बी
व	न	र	क्ष	क		री	त	स	र		ट		उ	ट

शनिवार, ४ मार्च २०१७ पुण्य नगरी **शब्दखेळ**



उभे शब्द

१. नायनाट, संहार, सर्वनाश
२. विश्व, दुनिया
३. वेढा, घोळका; आवाराची दगड रचून बनवलेली भिंत
४. अंधार, तिमिर; अज्ञान
५. माधुरी दीक्षितचा एक संगीतप्रधान चित्रपट
६. विस्तवाची आच, जाळ; शेकोटी
७. पीठ मळण्याचे पसरट पात्र
८. दरदिवशी; इंग्रजीत 'गुलाब'
९. अफगाणिस्तानची राजधानी
१०. कंटाळवाणी गोष्ट, रडकथा
१३. उपकरण, हत्यार, अवजार
१५. आयात-निर्यात कर वसुलीचे ठाणे
१९. कोपराने मारलेली ढुसणी
२१. '** तो कान पिळी' (म्हण)
२२. भीमाने उभा चिरलेला असुरराजा
२३. लीन, मिसळलेला, एकरुप झालेला
२५. शिरा-उपमा यापासून बनवतात
२६. जहर, गरळ
२८. निवडणुकीत 'हे' अमूल्य असते
२९. दैना, दुर्दशा, हाल
३०. दिल्ली येथील विमानतळाचे जुने नाव
३१. नामांकित, नामी; दिलदार
३४. श्रीविष्णूचा तिसरा अवतार; डुक्कर
३७. चामड्याची लांबट-अरुंद पट्टी
४०. गलबला, कालवा; गोंधळ
४२. 'रामनगरी'चे लेखक (आडनाव)
४३. मग, पुढे, थोड्या वेळाने
४४. भिंत (हिंदी)
४५. महाराष्ट्राची लावणीफेम लोककला
४६. मदन, मकरध्वज
४७. दूध न देणारी व निरर्थक जनावरे
४८. पातक, दुष्कृत्य, अधर्म
५०. मग्न, तल्लीन, रमलेला
५२. ग्राम, खेडे
५३. कर्ज, ऋण (इंग्रजी)
५५. 'सपना'चा प्रियकर
५७. खोड, दुर्गुण; वाईट सवय
६०. ऐन संध्याकाळ, तिन्हीसांजेची वेळ
६२. बारीक झणझण, किड्यांचा बुजबुजाट
६४. अगतिक, हताश, निरुपायी
६५. अस्थी, हाडूक
६६. रानरेडा
६८. वाद्य वाजवणारा
७०. घोडशाळा, घोड्यांचा तबेला
७१. निमित्त, कारण (हिंदी)
७३. वेतन, तनखा
७५. अयोध्यानगरी 'या' नदीच्या तीरावर वसली आहे
७६. ग्लानी, मरगळ, शीण
७७. स्वप्न (हिंदी)
८१. शासन, शिक्षा
८३. फोडातून स्रवणारा द्रवांश